# समाजशास्त्र विभागामार्फत "सामान्य ज्ञानावर प्रश्नमंजुषा स्पर्धा"




श्रीपतराव चौगुले कॉलेजमध्ये प्रश्नमंजुषा स्पर्धेचे बक्षिस वितरण करताना कार्यक्रमाचे अध्यक्ष,परीक्षक आणि समाजशास्त्राचे प्राध्यापक

श्रीपतराव चौगुले आर्टस् अॅण्ड सायन्स कॉलेज ,माळवाडी-कोतोली येथील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व समाजशास्त्र विभागामार्फत "सामान्य ज्ञानावर आधारित प्रश्नमंजुषा स्पर्धा" आयोजित करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक प्रो.डॉ. बी.एन.रावण होते.

अशा सामान्य ज्ञान असणाऱ्या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग दाखवला पाहिजे.यातून आपल्या ज्ञानाची तपासणी होत असते.नवीन शैक्षणिक धोरणानुसार स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांना टिकायचे असेल तर विविध विषयांचे परिपूर्ण ज्ञान असणे गरजेचे आहे. असे प्रतिपादन प्रोफेसर डॉ.बी.एन. रावण यांनी केले.

या प्रश्नमंजुषा स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून लेफ्टनंट डॉ.मनीषा सावंत,प्राअनिल महाजन यांनी काम पाहिले.

स्पर्धेसाठी एकूण छत्तीस विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. यामध्ये प्रथम क्रमांक वीरांगणी बाजीराव पाटील आणि मयुरी राजाराम गाडगीळ यांनी पटकावला , द्वितीय क्रमांक स्वराज संभाजी भुयेकर याने पटकावला तर तृतीय क्रमांक अनिष संदीप पाटील आणि प्रवीण पांडुरंग पाटील यांनी पटकावला.

सदरील विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व पुस्तक देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थित म्हणून डॉ.यु.यु.पाटील आणि डॉ.भारती शिंदे होत्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत डॉ.एस.एस.कुरलीकर यांनी केले आभार प्रा.दत्तात्रय नाईक यांनी मानले.